# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 17/ 05/2022**

### अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १६/०५/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १४,७००/– रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

### अवैध रेती वाहतुक करणाऱ्याविरूध्द कारवाई :–

दिनांक १६/०५/२०२२ रोजी फिर्यादी विशाल बळीराम घोळवे वय ३९ वर्ष व्य.नौकरी पोना/६७७ ने स्थागुशा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हट्टा येथे कलम ३७९ भादवी सहकलम ४८(७)(८) गौण खणीज अधि. अन्वये गुन्हा नोंद असुन दिनांक १६.०५.२२ रोजी चे १५:०० वा चे सुमारास यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या पुर्णा नदिच्या पात्रातुन अवैध रित्या गौण खणीज वाळु अंदाजे एक ब्रास किअ ५००० रू हि उत्खनन करून ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये भरून घेवुन जात असतांना ५७५००० रू मुद्देमालासह जवळा बाजार येथील नालेगावाकडे जाणारे कॅनॉलरोडवर मिळुन आला म्हणुन गुन्हा नोंद असुन अधिक तपास हट्टा पोलीस तपास करीत आहेत.

### जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.